ग्रामीण भागातील वस्त्यांची व रस्त्यांची
जातीवाचक नावे बदलून नवीन नावे
देण्याबाबत .

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः** व्हीपीएम- २०२१/प्र.क्र. ३४ /पं.रा.-३
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,मुंबई ४०० ००१.
दिनांक : २८ एप्रिल, २०२१

वाचा :- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग , शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०२०/प्र.क्र.३३ / अजाक, दि. ११ डिसेंबर २०२० .

**प्रस्तावना :-**

राज्यातील अनेक शहरातील व ग्रामीण भागातील अनेक गावांची , वस्त्यांची व रस्त्यांची जातीवाचक नावे बदलून अशा जातीवाचक नावाऐवजी महापुरुषांची व लोकशाही मूल्यांशी निगडित नावे देणे संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने संदर्भाधीन शासन निर्णय निर्गमित केला आहे .

संदर्भाधीन शासन निर्णयानुसार राज्यातील गावांची , वस्त्यांची व रस्त्यांची जातीवाचक नावे बदलून नवीन नावे देण्याबाबतची कार्यपध्दती शहरी भागासाठी नगर विकास विभागाने व ग्रामीण भागासाठी ग्राम विकास विभागाने निश्चित करुन जातीवाचक नावे बदलण्याची कार्यवाही करावयाची आहे. मात्र, गावाचे नाव बदलणे बाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येते .सबब, त्याबाबतची कार्यवाही या विभागाकडून करण्यात येणार नाही .उपरोक्त बाबी लक्षात घेता, राज्यातील ग्रामीण भागातील केवळ वस्त्यांची व रस्त्यांची जातीवाचक नावे बदलून नवीन नावे देण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याची व त्यानुषंगाने संबंधितांना निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती .

**शासन परिपत्रक :-**

राज्यातील ग्रामीण भागातील अनेक वस्त्यांची व रस्त्यांची नावे जातीवाचक असल्याची बाब महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला भूषणावह नसल्यामुळे राज्यात सामाजिक सलोखा व सौहार्द निर्माण होऊन राष्ट्रीय एकात्मता वृध्दींगत होण्याच्या दृष्टीने अशा सर्व वस्त्यांची व रस्त्यांची नांवे

बदलून अशा जातीवाचक नावाऐवजी महापुरुषांची व लोकशाही मूल्यांशी निगडित नावे देणे उचित राहील .

यास अनुसरून राज्यातील ग्रामीण भागातील वस्त्यांची व रस्त्यांची जातीवाचक नावे बदलून नवीन नावे देण्याबाबतची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहील :

(१) एखाद्या वस्तीचे वा रस्त्याचे जातीवाचक नाव बदलावयाचे असल्यास , त्या अनुषंगाने संबंधित गावाने ग्रामसभेत तसा ठराव पास करून त्याबाबतचा प्रस्ताव संबंधित गट विकास अधिकारी यांचे कडे सादर करावा .

(२) गट विकास अधिकारी यांनी सदर प्रस्ताव तपासून संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठवावा . संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव तपासून संबंधित विभागीय आयुक्त यांचे मार्फत सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव पाठवावा .

(३) शासन स्तरावर प्राप्त प्रस्तावाची तपासणी करून मा. मंत्री महोदय यांच्या मान्यतेने त्यावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल .

सदर आदेश हा परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

(पं. ख. जाधव)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन .**

प्रत –

१. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री याचे प्रधान सचिव / सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव
५. सर्व मा. विधानसभा , विधानपरिषद सदस्य व संसद सदस्य
६. मा. विरोधी पक्षनेते , विधानसभा / विधानपरिषद , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय , मुंबई
७. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
८. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक
९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
१०. सर्व विभागीय आयुक्त

११. सर्व जिल्हाधिकारी

१२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

१३. सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४. सर्व उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय

१५. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद

१६. निवडनस्ती (कार्यासन पंचायत राज- ३)

**महाराष्ट्र राज्यातील गावांची, वस्त्यांची व रस्त्यांची जातीवाचक नावे बदलून नवीन नावे देण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२०/प्र.क्र.३३/ अजाक**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक ११ डिसेंबर, २०२०.

**प्रस्तावना :-**

राज्यातील अनेक शहरातील व ग्रामीण भागातील अनेक गावांची, वस्त्यांची व रस्त्यांची नांवे जातीवाचक असल्याची बाब महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला भूषणावह नसल्यामुळे राज्यात सामाजिक सलोखा व सौहार्द निर्माण होऊन राष्ट्रीय एकात्मता वृध्दींगत होण्याच्या दृष्टीने अशा सर्व गावांची, वस्त्यांची व रस्त्यांची नांवे बदलून अशा जातीवाचक नावांऐवजी महापुरुषांची व लोकशाही मूल्यांशी निगडित नांवे देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील अनेक शहरातील व ग्रामीण भागातील अनेक गावांची, वस्त्यांची व रस्त्यांची नांवे जातीवाचक असल्याची बाब महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला भूषणावह नसल्यामुळे राज्यात सामाजिक सलोखा व सौहार्द निर्माण होऊन राष्ट्रीय एकात्मता वृध्दींगत होण्याच्या दृष्टीने अशा सर्व गावांची, वस्त्यांची व रस्त्यांची नांवे बदलून अशा जातीवाचक नावांऐवजी महापुरुषांची व लोकशाही मूल्यांशी निगडित नांवे देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर विषयाचे महत्व लक्षात घेऊन, जातीवाचक नावे बदलून नवीन नावे देण्याची कार्यपध्दती शहरी भागासाठी नगर विकास विभागाने व ग्रामीण भागासाठी ग्राम विकास विभागाने निश्चित करुन जातीवाचक नावे बदलण्याची कार्यवाही तातडीने करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२०१२१११२२१४१८४२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Shyam Arjunrao Tagade

Digitally signed by Shyam Arjunrao Tagade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=ebdccd1ea7bd29723d76653e72dddcc5cf97ff4fb69ce412d0d3c6d5c23adc3e, cn=Shyam Arjunrao Tagade
Date: 2020.12.11 12:26:48 +05'30'

**(श्याम तागडे)**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.विरोधी पक्षनेता विधान सभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
२. सर्व सन्माननीय सदस्य, विधान सभा/ विधान परिषद,

३. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई, महाराष्ट्र राज्य,
४. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
५. मा. उप मुख्यमंत्री, तथा मंत्री (वित्त व नियोजन) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
६. मा. मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव,
७. मा. राज्यमंत्री ( सा.न्या.) यांचे खाजगी सचिव,
८. मा. राज्यमंत्री (वि.स.) यांचे खाजगी सचिव,
९. मा. मंत्री सर्व यांचे खाजगी सचिव,
१०. मा. राज्यमंत्री सर्व यांचे खाजगी सचिव,
११. मा. अमुस/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, महाराष्ट्र राज्य,
१३. मा. प्रधान सचिव (सा.न्या. ) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१४. विभागीय आयुक्त सर्व महसूल विभाग, महाराष्ट्र राज्य,
१५. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई,
१६. आयुक्त, सर्व महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य,
१७. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
१८. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा, महाराष्ट्र राज्य,
२०. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद/ नगरपालिका, महाराष्ट्र राज्य,
२१. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण,
२२. सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण,
२३. निवडनस्ती ( अजाक ).